गणपती बाप्पा

गणरायाचे आगमन वाजत गाजत झाले
सकलजन आनंदाच्या जल्लोषात वाहून गेले
सजावटीचा थाट सुंदर मखराची आरास
मोदकांच्या मेजवानीचा बेत झाला झकास
रुसवेफुगवे विसरून भक्तजन आले एकत्र
मंगल धुंद वातावरणात चित्त झाले पवित्र
सुंदर गजानन मूर्ती देई मनाला आल्हाद
सुखकर्ता विघ्नहर्त्या देई विद्यादानाचा प्रसाद
गण्पतीबाप्पा तू दरवर्षी लवकर यावे
कृपा करून जीवनाला सुंदर रूप द्यावे
तुझ्या भक्तीरसातच मानवाने स्वतःला वाहावे
परमार्थाच्या मार्गावर पदक्रमण करावे

- डॉ. सोनिया शेट्ये